॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२५–२६/५३ दिनांक : १६/०६/२०२५

## अत्यंत तातडीचे व महत्वाचे परिपत्रक

स्मरणपत्र–१

प्रति,
मा. प्राचार्य, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२४–२५ चे रा.से.यो. वार्षिक लेखे त्वरित सादर करण्या बाबत.**

संदर्भ: १) या कार्यालयाचे जा.क्र. रासेयो/२०२५–२६/१५ दिनांक ०६/०६/२०२५ रोजीचे सुधारित परिपत्रक.

२) दिनांक १३/०६/२०२५ रोजी रा.से.यो. मंत्रालय येथे आयोजित ऑनलाईन बैठक

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकान्वये राष्ट्रीय ०सेवा योजना उपक्रम अंतर्गत सन २०२४–२५ रा. से.यो.खर्चाचे वार्षिक अंकेक्षण केंद्रीय पध्दतीने मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये **सीए मनोहर आयलानी अॅन्ड कंपनी, नांदेड** यांच्या मार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुषंगाने नियमित कार्यक्रम व विशेष वार्षिक शिबीराचे लेखे व अहवाल दि. **१० जून २०२५** पूर्वी विद्यापीठातील रा.से.यो.विभागात सादर करण्या बाबत कळविण्यात आले होते. व सदरील लेखे व अहवाल महाराष्ट्र शासन रा.से.यो. कक्षाकडे **१५ जून २०२५** पूर्वी पाठवणे आवश्यक होते. तथापी आज दिनांक १६/०६/२०२५ पर्यत केवळ १५ ते २० महाविद्यालयांनी नियमित कार्यक्रम व विशेष शिबीरांचे लेखे रा.से.यो. विभागात सादर केलेले आहेत व बाकीच्या महाविद्यालयांनी आपले लेखे व अहवाल अद्यापही सादर कलेला नाही,

त्यानुषंगाने रा.से.यो. मंत्रालयाद्वारे दिनांक १३ जून २०२५ रोजी आयोजित ऑनलाईन बैठकीत सन २०२४–२५ मधील महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठातंर्गत संलग्नित महाविद्यालयातील नियमित कार्यक्रम व विशेष शिबीरांचे लेखे दिनांक २६/०६/२०२५ पर्यत रा.से.यो. मंत्रालय, कक्ष मुंबई येथे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे व त्याशिवाय, सन २०२४–२५ मधील शिल्लक राहिलेले अनुदान मिळणार नाही असे कळविलेले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना या अत्यंत तातडीच्या व महत्वाच्या स्मरणपत्राद्वारे सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाचे सन २०२४–२५ मधील नियमित कार्यक्रम व विशेष शिबीरांचे लेखे दिनांक २३/०६/२०२५ पर्यत राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रस्तुत विद्यापीठ येथे सादर करणे आवश्यक आहे. सदरील दिनांका पूर्वी आपल्या महाविद्यालयांचे लेखे रा.से.यो. विभागात सादर न केल्यास सन २०२४–२५ मधील शिल्लक राहिलेले अनुदान सदरील महाविद्यालयास मिळणार नाही याची गांर्भीयाने नोंद घेण्यात यावी व नियमित कार्यक्रम व विशेष शिबीरांचे लेखे दिनांक २३/०६/२.०२५ पूर्वी रा.से.यो. विभागात सादर करण्यात यावेत, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.